आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२७ जून २०२४ - गुरुवार

देशातल्या जनतेनं या सरकारला तिसऱ्यांदा निवडून दिलं आहे कारण नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली रालोआ सरकारच आपल्या आकांक्षा पूर्ण करेल, असा जनतेला विश्वास वाटतो, गेल्या दहा वर्षातल्या सेवा आणि सुशासनावर शिक्कामोर्तब झालं आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज सांगितलं. अठराव्या लोकसभेच्या स्थापनेनंतर संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला त्या आज संबोधित करत होत्या. लोकसभेचं अधिवेशन सोमवारपासून सुरु झालं असून राष्ट्रपतींच्या अभिभाषणाने राज्यसभेच्या अधिवेशनाला सुरुवात झाली. अठरावी लोकसभा ही अनेक बाबतीत ऐतिहासिक असल्याचं त्यांनी सांगितलं.

भारत ही जगातली सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था आहे, आरोग्य, पोषण, हवामान बदल अशा अनेक आघाड्यांवर भारत जगाचं नेतृत्व करीत आहे, अनेक जागतिक समस्यांवर उत्तरं शोधत आहे , असं राष्ट्रपतींनी स्पष्ट केलं.

देशातले २५ कोटींहून अधिक नागरिक गरिबीतून बाहेर आले आहेत, ही समाधानाची बाब असल्याचं त्या म्हणाल्या. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक पैलूवर लक्ष दिलं जात आहे, देशात हरित रोजगार वाढवण्यावर भर दिला जात आहे, ईशान्य भारतात सर्व प्रकारची संपर्कव्यवस्था विकसित करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, चार दशकांनंतर पहिल्यांदाच वन रँक वन पेन्शन योजना लागू झाली आहे, इत्यादी मुद्द्यांचा त्यांनी उहापोह केला. पेपरफुटी प्रकरणाची निःपक्षपाती चौकशी होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रपतींच्या अभिभाषणानंतर लोकसभेचं आजचं कामकाज तहकूब झालं. राज्यसभेचं कामकाज सुरु झाल्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सभागृहाला नवीन मंत्र्यांची ओळख करून दिली. नंतर राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला आज प्रारंभ झाला. गेल्या आर्थिक वर्षात राज्याच्या अर्थव्यवस्थेतली वाढ ७ पूर्णांक ६ दशांश टक्के असेल, असा अंदाज आर्थिक पाहणी अहवालात वर्तवण्यात आला आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षात राज्याच्या स्थूल उत्पन्नात ९ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांची वाढ झाली होती. उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज दोन्ही सभागृहांच्या पटलावर हा अहवाल मांडला. सेवा क्षेत्रात सर्वाधिक ८ पूर्णांक ८ दशांश टक्के तर कृषी क्षेत्रात सर्वात कमी १ पूर्णांक ९ दशांश टक्के वाढ गेल्या आर्थिक वर्षात झाली. उद्योग क्षेत्राचा वाढीचा दर ७ पूर्णांक ६ दशांश टक्के राहील असं पूर्वानुमान आहे.

गेल्या आर्थिक वर्षात राज्याचं सांकेतिक स्थूल उत्पन्न ४० लाख ४४ हजार २५१ कोटी रुपये अपेक्षित आहे. त्या आधीच्या आर्थिक वर्षात तुलनेत त्यात सुमारे ५ लाख कोटी रुपयांची वाढ झाली. सांकेतिक स्थूल देशांतर्गत उत्पन्नात राज्याचा सरासरी हिस्सा सर्वाधिक आहे, असं या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात राज्याची राजकोषीय तूट २ पूर्णांक ८ दशांश टक्के, महसुली तूट अर्धा टक्के आणि कर्जाचं प्रमाण राज्याच्या उत्पन्नाच्या १७ पूर्णांक ६ दशांश टक्के आहे.

गेल्या आर्थिक वर्षात दरडोई राज्य उत्पन्न २ लाख ७७ हजार ६०३ रुपये असेल असा राज्य सरकारचा अंदाज आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत त्यात २५ हजार २१४ रुपयांची वाढ झाली. इतर राज्यांच्या तुलनेत दरडोई उत्पन्नात महाराष्ट्र देशात ६व्या स्थानी आहे.

गेल्या मान्सूनमध्ये राज्यात सरासरीच्या तुलनेत ८६ टक्क्यांहून अधिक पाऊस पडला.

राज्यभरात सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेसाठी आलेल्या उमेदवारांना योग्य सोयीसुविधा मिळत नसल्याचा मुद्दा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केला. त्यावर, यासंदर्भात सर्व संबंधित यंत्रणांना सूचना देण्यात आल्याचं, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. यानंतर दिवंगत आजी माजी सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करून विधान परिषदेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

राज्यातल्या शेतकऱ्यांसाठी तत्काळ कर्जमुक्ती योजना जाहीर करुन निवडणुकीपूर्वी त्याची अंमलबजावणी करावी अशी मागणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. मुंबईत वार्ताहर परिषदेत ते बोलत होते.

**<><><><><>**

नीट परीक्षेतल्या घोटाळ्यासंदर्भात राज्यात उघडकीस आलेल्या प्रकरणाची चौकशी केंद्रीय अन्वेषण संस्थेकडे सोपवण्यात आली आहे. याप्रकरणी लातूरच्या दोन शिक्षकांना अटक झाली असून सीबीआयने हातात घेतलेलं नीट संदर्भातलं हे चौथं प्रकरण आहे.

**//<><><><><>//**